Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

ISSN 2279 - 0489
Volume - VI, Issue - II, February - July - 2018

Impact Factor - 4.954 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. अलका अनिल मानकर

A Recognition of the Publication of the Paper Titled

भारतातील आर्थिक सुधारणा आणि दारिद्र्य

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877 Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

17

148



Peer Reviewed Refered
and UGC Listed Journal


ISSN 2279-0489

An International Multidisciplinary
Half Yearly Research Journal

# GENIUS

Volume - VI, Issue - II
February-July- 2018

Impact Factor / Indexing
2017 -4.954
www.sjifactor.com



AJANTA PRAKASHAN

| | | | |
|---|---|---|---|
| १० | डॉ. कालिदास सूर्यवंशी | इस्ट इंडिया कंपनीचा भारतातील घटनात्मक विकास | ४६-५४ |
| ११ | प्रा. डॉ. कुंदन एस. दुफारे | सामुहिक दुध प्रक्रिया उद्योगातून मूल्यवर्धनात्मक रोजगार निर्मिती | ५५-५८ |
| १२ | डॉ. पद्माकर ज्ञानोबा गोरे | छत्रपती शाहू महाराज आणि मल्लविद्या | ५९-६३ |
| १३ | डॉ. संजय मोहड | म्हणे सान 'वामन'<br><br>(महाकवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील 'वामन' या परिवर्तनीय नाममुद्रेचा थोडक्यात घेतलेला वेध) | ६४-७२ |
| १४ | प्रा. डॉ. लता रामचंद्र जावळे | वैदिक साहित्यात चित्रीत स्त्री जीवन आणि तिचे सामाजिक स्थान | ७३-७५ |
| १५ | प्रा. गोपाल चव्हाण | पंचायत समित्यांमधील महिला नेतृत्वाची वाटचाल (संदर्भ: यवतमाळ जिल्हा) | ७६-८० |
| १६ | प्रा. डॉ. अलका अनिल मानकर | भारतातील आर्थिक सुधारणा आणि दारिद्र्य | ८१-८९ |



'जिनिअस' या सहामयि प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोध निबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहील.

हे नियत कालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर ॲण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट, औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

१६

# भारतातील आर्थिक सुधारणा आणि दारिद्रय

प्रा. डॉ. अलका अनिल मानकर
श्री. पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा (रेल्वे), जि. बुलडाणा.

अर्थव्यवस्थेत आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी व नवी आर्थिक घडी बसविण्यासाठी सन 1991 पासून नवीन आर्थिक धोरण स्विकारले गेले आहे. परंतू ही सर्व धडपड चालु असतांना विकासाकडे वाटचाल करतांना गोरगरिबांच्या हाल अपेष्टा मात्र वाढतच चालल्याचे दिसते. भारतात अद्यापही 40 टक्के लोक दारिद्रयरेषेखाली जीवन जगतात. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ताज्या अहवालानुसार भारतात आर्थिक सुधारणाची सुरुवात झाली तेव्हापासून उपभोगाच्या बाबतीत विशमतेची दरी वाढतच आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शहरीकरण वाढतच आहे. त्याबरोबंर दारिद्रय वाढत आहे. ग्रामीण भागातील दारिद्रय वाढत आहे.

दारिद्रय निर्मुलनाचे उदिदष्ट प्राप्त करण्यासाठी भारतात गेल्या पंचवीस वर्षापासून गरिबी हटाओ चा गाजावाजा केला जात आहे तरी अद्याप काहीच साधले नाही. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, मूलोद्योगी शिक्षण, अंक-ओळख, रोजगाराची संधी, सामाजिक सहभाग यासारख्या पायाभूत सुविधा नाहीत.

**दारिद्रयांची संकल्पना**

1. जागतिक विकास अहवाल 2000-2001

"सुस्थितीपासून पूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्रय"

2. प्रा. अमर्त्य सेन

"एखादया व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र होय"

3. किमान गरजा आणि प्रभावी मागणीच्या अंदाजासाठी नेमलेला तज्ञ गट 1980-85

"ग्रामीण भागासाठी दररोज प्रती व्यक्ती किमान 2400 कॅलरीज आणि शहरी भागासाठी किमान 2100 कॅलरीज मिळविण्यासाठी लागणारे अन्न मिळविण्यासाठी असमर्थता म्हणजे दारिद्रय होय"

4. जागतिक बँक

"माणसी दर दिवषी एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्न मिळविणा-या व्यक्ती म्हणजे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती होय."

थोडक्यात वरिल व्याख्यांवरून असे दिसून येते की, ज्या लोकांना वर्षातील काही दिवस उपाषी पोटी राहावे लागते, पुरेसा आहार मिळत नाही, कित्येकदा मजूरीसाठी बाहेरगांवी स्थलांतर करावे लागते, कर्ज काढण्याषिवाय ते आपला उदरनिर्वाह भागवू शकत नाही, त्यांना वर्षातील कित्येक काळ बेरोजगार रहावे लागते, मजूरी करावी लागते, ज्यांना पुरेसे वस्त्र मिळत नाही, निवारा देखील अत्यंत निकृष्ट स्वरुपाचा असतो, असतो, ते आपल्या पाल्यांना पूर्ण शिक्षण देऊ शकत नाहीत, ज्यांना सतत सरकारच्या स्वस्त धान्यावर

अवलंबून राहावे लागते, क्रयशक्ती नसल्याने ते धान्य विकत घेऊ शकत नाहीत. त्यामुळे लोक आपल्या जीवन मानाची पातळी उंचावू शकत नाहीत.

**दारिद्र्याची परिमाणे**

१) उत्पन्न दारिद्र्य अथवा वस्तू वंचितता

2) आरोग्य आणि शिक्षण यापासूनची वंचितता

3) धोक्याच्या आणि असुरक्षिततेच्या वातावरणातील वावर

4) भूक सोषिकपणा आणि दौर्बल्यता

हे दारिद्र्याचे पैलु आहेत.

भारतातील दारिद्र्य योजना आयोग, बी.एस. मिन्हास आणि वैद्यनाथन, प्रा. दांडेकर आणि डॉ. रथ या तज्ज्ञांनी अभ्यासले. दांडेकर आणि रथ यांच्या उपभोग खर्च निकषानुसार 1960-1961 मध्ये भारतातील ग्रामिण भागांतील 40 टक्के तर शहरी भागातील 10 टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली होते.

**भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण**

| अ.क्र | वर्ष | भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील प्रमाणे | भारतातील शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील प्रमाणे | भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| 1 | 1973 | 56.40 | 49.00 | 54.90 |
| 2 | 1977 | 53.10 | 45.20 | 51.30 |
| 3 | 1983 | 45.70 | 40.80 | 44.50 |
| 4 | 1987 | 39.10 | 38.20 | 38.90 |
| 5 | 1993 | 37.30 | 32.30 | 36.00 |
| 6 | 2000 | 27.10 | 23.60 | 26.10 |
| 7 | 2004 | 28.30 | 25.10 | 27.50 |
| 8 | 2007 | 21.10 | 15.10 | 19.30 |

वरील तक्त्यावरून असे निदर्षनास येते की, 1973 च्या तुलनेत 2007 मधील दारिद्र्याचे प्रमाण कमी आहे. तरी 1973 पासून देशाच्या लोकसंख्येत मात्र बरीच वाढ झालेली आहे. त्यामुळे जवळ जवळ 22 कोटी लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगते.

देशात आर्थिक सुधारणांचे जवळ जवळ व्दिदशक पूर्ण झाले परंतू बेकारी, अज्ञान, अंधश्रध्दा, औद्योगिक आजारपण, शेतक-यांच्या आत्महत्या, कुपोशण या सर्व समस्यांचे मूळ असणारी दारिद्र्य ही समस्या अजूनही भेडसावत आहे. प्रत्यक्ष दीर्घ आणि निरोगी आयुष्य, □□□□□□□□ पातळी (सर्वसाधारणपणे दरडोई उत्पन्नानुसार ठरणारे) राहणीमान या सर्वच बाबतीत भारत बराच मागासलेला आहे.

भारतातील दारिद्र्याचा प्रश्न हा काही नव्याने निर्माण झालेला नाही तर स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासुन हा प्रश्न भेडसावत आहे. महाभारतात देखील दारिद्र्याचे उल्लेख आहेत. इ.स. 1971 मध्ये दादाभाई नोरोजींचा "अन् ब्रिटिश रूल इन इंडिया" हा महान ग्रंथ प्रसिध्द झाला. तेव्हापासुन तर देशातील दारिद्र्याच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष वेधले जाऊ लागले. त्याविशयी अधिक चर्चा होऊ लागली. विख्यात संख्याशास्त्रज्ञ, विचारवंत, तसेच जागतिक बॅंके सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांनी देखील अलीकडील काळात

दारिद्रयाच्या प्रश्नांचा खूप विचार केला असला तरी या प्रश्नाचे नेमके स्वरूप याविशयी मतांमध्ये विविधता दिसून येते.

थोडक्यात दारिद्रयाची संकल्पना दोन दृष्टिकोणातून विचारात घेतली जाते

1) निरपेक्ष दारिद्रय

2) सापेक्ष दारिद्रय.

**1) निरपेक्ष दारिद्रय (Concept of Absolute Poverty )**

विचारात घेतांना राहणीमानाचा किमान आवष्यक दर्जा आधारभूत मानला जातो. त्यानुसार ज्यांच्याकडे किमान अत्यावष्यक गरजा भागविण्याचे उत्पन्न नाही, ते ज्यांच्याकडे दररोज दरडोई 2100 ते 2400 उष्मांक देणारा किमान आहार घेण्याएवढे उत्पन्न नाही ते, आणि ज्यांच्या कुटूंबाचा वार्षिक उपभोग खर्च 6420 रू. (ग्रामीण भाग) व 7320 रू. (शहरी भाग) या पेक्षा कमी आहे ते सर्व दारिद्रय रेषेखाली आहेत. असे मानले जाते.

**2) सापेक्ष दारिद्रय (Concept of Relative Poverty )**

या संकल्पने मध्ये विविध उत्पन्न गटानुसार लोकसंख्येची विभागणी केली जाते. उच्च उत्पन्न गटातील शेकडा 5 ते 10 टक्के लोकसंख्येच्या राहणीमानाची तुलना तळातील उत्पन्न गटातील शेकडा 5 ते 10 टक्के लोकसंख्या राहणीमानाशी केली जाते. वरच्या उत्पन्न गटातील लोकसंख्येपेक्षा तळातील उत्पन्न गटातील लोकसंख्या सापेक्षपण दारिद्रयात आहे, असे मानले जाते. जीवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा पूर्ण (Basic Necessities ) करण्यासाठी असमर्थता म्हणजे गरिबी होय. अशा अवस्थेत राहणीमान इतक्या निम्नस्तरावर पोहोचते की मनोबल शरिरीक स्वास्थ टिकवून ठेवणे कठीण होते. शिवाय दीर्घकाळापर्यंत अशा स्थितीत धन किंवा इतर साधनेही मिळत नाही. ज्यावेळी श्रमिकांचे सतत शोषण होते तेव्हा दारिद्रय निर्माण होते. अशा वेळेस या .अवस्थेतून बाहेर पडणे कठीण होते. थोडक्यात दारिद्रयाचे दुष्टचक निर्माण होते. भारतात प्रतिदिन एका व्यक्तीसाठी खेडयात 2400 कॅलरीज तर शहरी क्षेत्रात प्रतिदिन एका व्यक्तीसाठी 2100 कॅलरीज उष्मांकाची कमीत कमी गरज मानली गेली आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी 93-94 सालातील मुल्यानुसार खेडेगावात रू. 228.90 पै. प्रत्येक व्यक्तीला दरमहा खर्च येतो. तर शहरी भागातील व्यक्तीला दरमहा रू. 264.10 पै. एवढा खर्च निर्धारित केलेला आहे. याखालील लोक दारिद्रय रेषेखाली येतात.

दारिद्रय हे फक्त भारतीय अर्थव्यवस्थेसमोरीलच अरिष्ट नाही तर दारिद्रय हे सा-या जगाला आव्हान आव्हान आहे. देषातील दारिद्रयाची वाढती तीव्रता मात्र चिंताजनक आहे. देशातील लोकसंख्या सातत्याने वाढत असल्याने भुकेचा प्रश्न अधिक गंभीर रूप धारण करत आहे. आर्थिक उदारीकरणामुळे रोजगार निर्मितीच्या दरात अपेक्षित वाढ झाली नाही. 1980 ते 1990 या काळात रोजगार वृध्दीचा वार्षिक दर सुमारे 24 टक्के होता. त्या काळात रोजगार संधी 3026 लक्षांवरून 3570 लक्षांपर्यत वाढल्या 1990 ते 1998 या काळात मात्र ही संख्या 3570 लक्षांवरून सुमारे 3830 लक्षांपर्यत वाढली. रोजगावृध्दीचा वार्षिक दर या दशकात सुमारे एक टक्काच राहिला सुधारणांच्या या दशकात एका बाजुला रोजगार निर्मितीचा अल्प दर आणि रोजगाराची मागणी करणा-यांच्या संख्येतील वाढीचा दर यात असंतूलन असल्याने बेरोजगारीची समस्या भेडसावत आहे. नविन आर्थिक धोरणानुसार केवळ भांडवल निर्मिती उदयोगांवर भर देत राहिल्यास देशातील बेकारी वाढेल. कामगारांच्या नित्याच्या वापराच्या किमान आवष्यक वस्तूंच्या

(वेतन वस्तूंच्या) उत्पादनात अपेक्षित वाढ केली जात नसल्याने त्यांच्या चढया किंमती गरिबांना या नाहीत. त्यामुळे रोजगार फारसा वाढत नाही. परिणामतः दारिद्रया वाढते.

सध्याच्या मुक्त व्यापार धोरणात कृषी क्षेत्राची मात्र उपेक्षा झालेली दिसते कृषी क्षेत्राच्या विकासा करिता शासनाने त्या त्या विभागानुसार उपाय योजने आवश्यक आहे. शेतीची सुधारणा झाली तरच आर्थिक वृध्दीला गती मिळेल. शेतीच्या प्रगतीमुळे दारिद्रय निर्मुलनाला हातभार लागेल आर्थिक सुधारणांच्या काळातील शेती क्षेत्रातील स्थूल भांडवल निर्मिती अन्य क्षेत्रांच्या तुलनेत गरजेपेक्षा खूपच कमी आहे. कारण पतपुरवठा अपुरा आहे.

गेल्या काही वर्षात प्रादेषिक विशमता सुध्दा वाढत आहे 'पंजाब' महाराष्ट्र या सारख्या अधिक प्रगत राज्यांच्या मानाने ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश यासारखी राज्ये बरीच मागे पडली आहेत. दारिद्रय ग्रस्त लोकांपैकी 60 टक्के लोक बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश या राज्यांत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था मागसलेली असल्याची कारणे म्हणजे शेती, सिंचनाचा अभाव इ. मुळे सार्वजनिक गुंतवणुकीत आर्थिक सुधारणांच्या दशकात घट घडुन आली.

**भारतीय अर्थ व्यवस्थेत दारिद्रयाची समस्या निर्माण होण्याची कारणे पुढील प्रमाणे**

1. वेगाने वाढणारी लोकसंख्या
2. वाढती बेकारी
3. आर्थिक प्रेरणेचा अभाव
4. आर्थिक विषमता
5. दोशपूर्ण शिक्षण प्रणाली
6. मागासलेली शेती
7. ब्रिटिशांची सत्ता
8. उत्पादक साधनांची कमतरता
9. अनुत्पादक लोकसंख्या
10. शोषण
11. भाववाढ
12. व्यसनाधीनता

**भारतातील ग्रामीण दारिद्रय वाढण्याची कारणे पुढील प्रमाणे**

**1. ग्रामीण भागातील जमिनीची विशम वाटणी**

ग्रामीण भागात शेती हा प्रमुख उपजीविकेचा मार्ग आहे. ब-याच लोकांकडे शेतीसाठी अजिबात जमिन नसते त्यामुळे त्यांना शेतमजुर म्हणुन काम करावे लागते. हे काम अनियमित असते. त्यामुळे अल्पउत्पन्न त्यांना मिळते.

**2. निसर्गलहरी वरील शेती**

ग्रामीण भागात सिंचनाच्या सोयीचा अभाव असल्याकारणाने शेती निसर्गलहरीवर अवलंबून असते. पाऊस योग्य वेळी न पडल्याने पीक चांगले येत नाही उत्पन्न कमी मिळते.

**3. शोषण**

कुळांचे जमिन मालकांकडुन षोशण होते. अर्जदाराने सावकारांकडुन षोशण होते. लहान उत्पादकांचे दलालांकडून शोषण होते. मजूरांचे मालकांकडून शोषण होते. त्यामुळे लोकांना रास्त उत्पन्न मिळत नाही अनावश्यक खर्च करावा लागतो.

**4. सामाजिक रचना**

परंपरागत ग्रामीण भागात जातिव्यवस्था प्रभावी आहे. आज ही बंधने शिथिल झाली असली तरी गरिब लोक शिक्षण घेत नाहीत त्यामुळे चांगले काम मिळत नाही पर्यायाने दारिद्रय वाढते.

अशा पध्दतीने विविध कारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत सातंत्याने दारिद्रय वाढीची समस्या निर्माण झालेली दिसते. आज एकीकडे विकासाकडे वाटचाल करतांना दुसरीकडे मात्र दारिद्रयाच्या दुष्टचकात बरेच लोक अडकलेले दिसतात. आज भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात **"India is Rich Country But People is Poor"** असे म्हटले जाते.

जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत जर भारताला आपले अस्तित्व कायम ठेवायचे असेल नव्हे त्या शर्यतीत पुढे जायचे असेल तर देषातील "दारिद्रय" ही समस्या सोडविणे अनिवार्य ठरते. त्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपाययोजना अंमलात आणल्या गेल्या पाहिजे. दारिद्रयाचा प्रश्न हा केवळ आर्थिक प्रश्न नसून सामाजिक व राजकीय प्रश्नही आहे.

विकासाबरोबर दारिद्रय कमी होण्यासाठी देशात प्रभावी बाजार यंत्रणा असणे जरूर असते.

विकासातून निर्माण होणारी संपत्ती ज्यांच्याकडे मोठया प्रमाणात जाते त्यांनी त्या संपत्तीतून उत्पादक गुंतवणूक करणे आवश्यक असते त्यामुळे रोजगार वाढुन सर्वसामान्यांची स्थिती सुधारते.

दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमातील महत्वाच्या भाग रोजगार योजना राबविणे ग्रामीण भागात सिंचन,

रस्ते व इमारती बांधणे, सामाजिक वनीकरण, फळबागा लागवड अशा योजना हाती घेऊन कायमस्वरूपी उत्पादक मालमत्ता निर्माण केली जाते त्यामुळे रोजगार निर्माण होतो.

ग्रामीण भागातील तरूणांना तांत्रिक शिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून दिल्यास दारिद्रय दूर होण्यास मदत होते.

शेतक-यांनी आपली शेती केवळ उपजिविकेसाठी न करता व्यावहारिक दृष्टीकोण डोळयासमोर ठेवुन केल्यास त्यांना अधिक उत्पन्न मिळते. तसेच शेती आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केल्यास कृषीची उत्पादकता देखील वाढते.

ग्रामीण भागात एकीकडे धूप झाल्यामुळे निकस होत चाललेली जमिन आणि दुसरीकडे गाळामुळे पाणी साठविण्याची कमी होणारी क्षमता असे विसंगत चित्र दिसते. विहीरी, तलाव, बंधारे आणि धरणे यातील गाळ काढुन तो शेतीसाठी वापरण्यासाठी कामे रोजगार हमी योजनेत सुरू केल्यास पाणी साठा करण्याची क्षमता वाढु शकेल तसेच शेतीतील उत्पादन देखील वाढेल. व्यसनांमुळे देखील दारिद्रय वाढते त्यामुळे लोकांना महत्व पटवुन देऊन व्यसनमुक्ती करावी.

आधुनिक काळात लोकांची उपभोग प्रवृत्ती खूप मोठया प्रमाणात वाढली त्यामुळे कर्जाचा विनियोग अनुत्पादक कार्यासाठी केला गेल्याने कृषी उत्पन्न घटत आहे. दारिद्रय वाढत आहे. अशावेळेस कृषी वित्ताचा उपभोग जर केवळ उत्पादक कार्यासाठी केला गेला तर कृषी उत्पन्न वाढुन दारिद्रय कमी होईल.

दारिद्रयाच्या प्रश्नावर तोडगा म्हणुन आर्थिक वृध्दिदरात वाढ हा एक दीर्घकालीन उपाय होऊ शकतो त्याकरिता उद्योजकांना प्रेरणा देणारे उपाय केवळ अर्थ संकल्पात समाविष्ट असून चालणार नाही तर त्या उपायांमुळे रोजगारात वाढ कशी होईल याकडे लक्ष देणे महत्वाचे ठरते. शिक्षण, आरोग्य विषयक सुविधा दारिद्रय निवारणाकरीता साहयाकारी ठरू शकते.

"रोहयो" (रोजगार हमी योजना) अंतर्गत रस्ते, लहान धरणे, कालवे इ. मूलभूत संरचना शक्य होतील प्रकल्प राबविले तरं ग्रामीण भागातील लहान उद्योगांना मदत मिळून शेतीविकास देखील घडुन येईल.

शेतीपुरक व्यवसाय उदा : पषुपालन, दुग्धपालन, मच्छीपालन, कुक्कुटपालन, वनीकरण इ. योजना राबविण्याकरीता विकास केंद्र स्थापन करावी.

अशा पध्दतीने देशातील अर्थव्यवस्थेसमोर ज्या अनेक समस्या आहेत त्यापैकी दारिद्रय ही ज्वलंत समस्या आहे ती दूर केल्यास निश्चित अर्थव्यवस्था विकसित होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ**

1. अर्थशास्त्रकोश - प्रा. डॉ. यशवंत रासवीकर
प्रा. वि. ज. गोडबोले
प्रा. जॉन्सन बोर्जेस

२. अर्थ संवाद -

३. भारतीय अर्थ व्यवस्थेची वाटचाल - प्रा. शरद शंकर जोशी

4. "स्वातंत्रोत्तर भारतातील विकास यातून - डॉ. श्रीनिवास खांदेवाले

**गोषवारा**

**1991** पासून भारतात आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी नविन आर्थिक धोरण स्विकारले अनेक आर्थिक सुधारणा करण्यात आल्या परंतू अद्यापही भारतात **40** टक्के लोक दारिद्ररेषेखाली जीवन जगतात. राष्ट्रीय नमुना पाहणीच्या ताज्या अहवालानुसार भारतात आर्थिक सुधारकाची सुरूवात झाली तेव्हापासून उपभोगाच्या बाबतीत विषमतेची दरी वाढतच आहे. एकिकडे शहरीकरण वाढतच आहे परंतू या शहरामध्ये रस्त्यावार फिरणारे भिकारी, बसस्टेंड, रेल्वेस्टेशन या ठिकाणी उघडयावर राहणा-याची संख्या वाढत आहे. ग्रामीण भागात षिक्षण, आरोग्य, मुलोद्योगी शिक्षण, अंक ओळख, रोजगाराची संधी, सामाजिक सहभाग या सारख्या पायाभूत सुविधांचा अभाव त्यामूळे दारिद्रय वाढते.

**दारिद्रयाची संकल्पना**

जागतिक विकास अहवाल **2000-2001**

**"सुस्थितीपासुन पूर्णपणे वंचित असणे म्हणजे दारिद्रय"**

**प्रा. अमर्त्य सेन**

**"एखादया .व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्याप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय"**

थोडक्यात ज्या लोकांना वर्षातील काही दिवस उपाशी पोटी राहावे लागते. पुरेसा आहार मिळत नाही. कित्येकदा मजूरीसाठी बाहेरगांवी स्थलांतर करावे लागते कर्जाषिवाय उदरनिर्वाह भागवता येत नाही वर्षातील कित्येक काळ बेकार राहावे लागते मजूरी करावी लागते अन्न, वस्त्र, निवारा या सारख्या मुलभूत गरजांची पूर्तता होत नाही. आपल्या पाल्याना पूर्ण शिक्षण देवू शकत नाहीत सतत सरकारच्या स्वस्त धान्यावर अवलंबून राहावे लागते.

दारिद्रयाची परिमाणे

1. उत्पन्न दारिद्रय अथवा वस्तू वंचितता
2. आरोग्य आणि षिक्षण यापासूनची वचितता
3. धोक्याच्या आणि असुरक्षिततेच्या वातावरणातील वावर
4. मूक सोषिकपणा आणि दौर्बल्यता

हे दारिद्रयाचे पैलू आहेत.

भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण

| अ.क्र | वर्ष | भारतातील ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील प्रमाणे | भारतातील शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील प्रमाणे | भारतातील दारिद्रय रेषेखालील लोकांची प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| 1 | 1973 | 56.40 | 49.00 | 54.90 |
| 2 | 1977 | 53.10 | 45.20 | 51.30 |
| 3 | 1983 | 45.70 | 40.80 | 44.50 |
| 4 | 1987 | 39.10 | 38.20 | 38.90 |
| 5 | 1993 | 37.30 | 32.30 | 36.00 |
| 6 | 2000 | 27.10 | 23.60 | 26.10 |
| 7 | 2004 | 28.30 | 25.10 | 27.50 |
| 8 | 2007 | 21.10 | 15.10 | 19.30 |

वरील तक्त्यावरून असे निदर्षनास येते की, 1973 च्या तुलनेत 2007 मधील दारिद्रयाचे प्रमाण कमी आहे. तरी 1973 पासून देषांच्या लोकसंख्येत मात्र बरीच वाढ झालेली आहे. त्यामुळे जवळ जवळ 22 कोटी लोकसंख्या दारिद्रयरेषेखाली जीवन जगते.

देशात आर्थिक सुधारणांचे जवळ जवळ व्दिदशक पूर्ण झाले "परंतू बेकारी, अज्ञान, अंधश्रध्दा, औद्योगिक आजारपण, षेतक-यांच्या आत्महत्या, कुपोशण या सर्व समस्यांचे मूळ असणारी दारिद्रय ही समस्या अजूनही भेडसावत आहे. प्रत्यक्ष दीर्घ आणि निरोगी आयुष्य, शैक्षणिक पातळी (सर्वसाधारणपणे दरडोई उत्पन्नानुसार ठरणारे) राहणीमान या सर्वच बाबतीत भारत बराच मागासलेला आहे.

भारतातील दारिद्रयाचा प्रश्न हा काही नव्याने निर्माण झालेला नाही तर स्वातंत्रपूर्व कालखंडापासुन हा प्रश्न भेडसावत आहे. महाभारतात देखील दारिद्रयाचे उल्लेख आहेत. इ.स. 1971 मध्ये 'दादाभाई नोरोजींचा "अन् ब्रिटिश रूल इन इंडिया" हा महान ग्रंथ प्रसिध्द झाला. तेव्हापासुन तर देशातील दारिद्रयाच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष वेधले जाऊ लागले. त्याविशयी अधिक चर्चा होऊ लागली. विख्यात संख्याषास्त्रज्ञ, विचारवंत, तसेच जागतिक बँके सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांनी देखील अलीकडील काळात दारिद्रयाच्या प्रष्नाचा खूप विचार केला असला तरी या प्रश्नाचे नेमके स्वरूप याविशयी मतांमध्ये विविधता दिसून येते. दारिद्रय हे फक्त भारतीय अर्थव्यवस्थेसमोरीलच अरिष्ट नाही तर दारिद्रय हे सा-या जगाला आव्हान आहे. देषातील दारिद्रयाची वाढती तीव्रता मात्र चिंताजनक आहे. देशातील लोकसंख्या सातत्याने वाढत असल्याने भुकेचा प्रश्न अधिक गंभीर रूप धारण करत आहे. आर्थिक उदारीकरणामुळे रोजगार निर्मितीच्या दरात अपेक्षित वाढ झाली नाही. 1980 ते 1990 या काळात रोजगार वृध्दीचा वार्षिक दर

सुमारे 24 टक्के होता. त्या काळात रोजगार संधी 3026 लक्षांवरून 3570 लक्षांपर्यंत वाढल्या 1990 ते 1998 या काळात मात्र ही संख्या 3570 लक्षांवरून सुमारे 3830 लक्षांपर्यंत वाढली. रोजगावृध्दीचा वार्षिक दर या दशकात सुमारे एक टक्काच राहिला सुधारणांच्या या दशकात एका बाजुला रोजगार निर्मितीचा अल्प दर आणि रोजगाराची मागणी करणा-यांच्या संख्येतील वाढीचा दर यात असंतूलन असल्याने बेरोजगारीची समस्या भेडसावत आहे. नविन आर्थिक धोरणानुसार केवळ भांडवल निर्गिती उदयोगांवर भर देत राहिल्यास देषातील बेकारी वाढेल. कामगारांच्या नित्याच्या वापराच्या किमान आवश्यक वस्तूंच्या (वेतन वस्तूंच्या) उत्पादनात अपेक्षित वाढ केली जात नसल्याने त्यांच्या चढया किंमती गरिबांना या नाहीत. त्यामुळे रोजगार फारसा वाढत नाही. परिणामतः दारिद्रया वाढते.

सध्याच्या मुक्त व्यापार धोरणात कृषी क्षेत्राची मात्र उपेक्षा झालेली दिसते कृषी क्षेत्राच्या विकासा करिता शासनाने त्या त्या विभागानुसार उपाय योजणे आवष्यक आहे. शेतीची सुधारणा झाली तरच आर्थिक वृध्दीला गती मिळेल. शेतीच्या प्रगतीमुळे दारिद्रंय निर्मुलनाला हातभार लागेल आर्थिक सुधारणांच्या काळातील शेती क्षेत्रातील स्थूल भांडवल निर्मिती अन्य क्षेत्रांच्या तुलनेत गरजेपेक्षा खूपच कमी आहे. कारण पतपुरवठा अपुरा आहे.

गेल्या काही वर्षात प्रादेशिक विषमता सुध्दा वाढत आहे 'पंजाब' महाराष्ट्र या सारख्या अधिक प्रगत राज्यांच्या मानाने ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश यासारखी राज्ये बरीच मागे पडली आहेत. दारिद्रय ग्रस्त लोकांपैकी 60 टक्के लोक बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश या राज्यांत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था मागसलेली असल्याची कारणे म्हणजे शेती, सिंचनाचा अभाव इ. मुळे सार्वजनिक गुंतवणुकीत आर्थिक सुधारणांच्या दशकात घट घडुन आली.

**भारतीय अर्थ व्यवस्थेत दारिद्रयाची समस्या निर्माण होण्याची कारणे पुढील प्रमाणे**

1. वेगाने वाढणारी लोकसंख्या
2. वाढती बेकारी
3. आर्थिक प्रेरणेचा अभाव
4. आर्थिक विषमता

५.दोषपूर्ण पिक्षण प्रणाली

6, मागासलेली शेती

7. ब्रिटिशांची सत्ता
8. उत्पादक साधनांची कमतरता
9. अनुत्पादक लोकसंख्या
10. शोषण
11. भाववाढ
12. व्यसनाधीनता

अशा पध्दतीने विविध कारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत सातत्याने दारिद्रय वाढीची समस्या निर्माण झालेली दिसते. आज एकीकडे विकासाकडे वाटचाल करतांना दुसरीकडे मात्र दारिद्रयाच्या दुष्टचक्रात बरेच लोक अडकलेले दिसतात. आज भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात **"India is Rich Country But People is Poor"** असे म्हटले जाते.

जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत जर भारताला आपले अस्तित्व कायम ठेवायचे असेल नव्हे त्या शर्यतीत पुढे जायचे असेल तर देषातील "दारिद्रय" ही समस्या सोडविणे अनिवार्य ठरते. त्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपाययोजना अंमलात आणल्या गेल्या पाहिजे. दारिद्रयाचा प्रश्न हा केवळ आर्थिक प्रश्न नसून सामाजिक व राजकीय प्रश्नही आहे.

विकासाबरोबर दारिद्रय कमी होण्यासाठी देषात प्रभावी बाज़ार यंत्रणा असणे जरूर असते.

विकासातून निर्माण होणारी संपती ज्यांच्याकडे मोठया प्रमाणात जाते त्यांनी त्या संपत्तीतून उत्पादक गुंतवणूक करणे आवष्यक असते त्यामुळे रोजगार वाढुन सर्वसामान्यांची स्थिती सुधारते.

दारिद्रय निर्मुलन कार्यकमातील महत्वाच्या भाग रोजगार योजना राबविणे ग्रामीण भागात सिंचन, रस्ते व इमारती बांधणे, सामाजिक वनीकरण, फळबागा लागवड अषा योजना हाती घेऊन कायमस्वरूपी उत्पादक मालमत्ता निर्माण केली जाते त्यामुळे रोजगार निर्माण होतो.

ग्रामीण भागातील तरूणांना तांत्रिक शिक्षण देऊन' रोजगार. उपलब्ध करून दिल्यास दारिद्रय दूर होण्यास मदत होते.

शेतक-यांनी आपली शेती केवळ उपजिविकेसाठी न करता व्यावहारिक दृष्टीकोण डोळयासमोर ठेवुन केल्यास त्यांना अधिक उत्पन्न मिळते. तसेच . शेती आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून केल्यास कृषीची उत्पादकता देखील वाढते.

ग्रागीण भागात एकीकडे धूप झाल्यामुळे निकस होत चाललेली जमिन आणि दुसरीकडे गाळामुळे पाणी साठविण्याची कमी होणारी क्षमता असे विसंगत चित्र दिसते. विहीरी, तलाव, बंधारे आणि धरणे यातील गाळ काढुन तो षेतीसाठी वापरण्यासाठी कामे रोजगार हमी योजनेत सुरू केल्यास पाणी साठा करण्याची क्षमता वाढु शकेल तसेच शेतीतील उत्पादन देखील वाढेल. व्यसनांमुळे देखील दारिद्रय वाढते त्यागुळे लोकांना महत्व पटवुन देऊन व्यसनमुक्ती करावी.

आधुनिक काळात लोकांची उपभोग प्रवृत्ती खूप मोठया प्रमाणात वाढली त्यामुळे कर्जाचा विनियोग अनुत्पादक कार्यासाठी केला गेल्याने कृषी उत्पन्न घटत आहे. दारिद्रय वाढत आहे. अशावेळेस कृषी वित्ताचा उपभोग जर केवळ उत्पादक कार्यासाठी केला गेला तर कृषी उत्पन्न वाढुन दारिद्रय कमी होईल.

दारिद्र्याच्या प्रश्नावर तोडगा म्हणुन आर्थिक वृध्दिदरात वाढ हा एक दीर्घकालीन उपाय होऊ शकतो त्याकरीता उद्योजकांना प्रेरणा देणारे उपाय केवळ अर्थ संकल्पात समाविष्ट असून चालणार नाही तर त्या उपायांगुळे रोजगारात वाढ कशी होईल याकडे लक्ष देणे महत्वाचे ठरते. शिक्षण, आरोग्य विषयक सुविधा दारिद्रय निवारणाकरीता साहयाकारी ठरू शकते.

"रोहयो" (रोजगार हमी योजना) अंतर्गत रस्ते, लहान धरणे, कालवे इ. मूलभूत संरचना शक्य होतील असे प्रकल्प राबविले तर ग्रामीण भागातील लहान उद्योगांना मदत मिळून शेतीविकास देखील घडुन येईल.

शेतीविषयक व्यवसाय उदा : पषुपालन, दुग्धपालन, मच्छीपालन, कुक्कुटपालन, वनीकरण इ. योजना राबविण्याकरिता विकास केंद्र स्थापन करावी.

अशा पद्धतीने देशातील अर्थव्यवस्थेसमोर ज्या अनेक समस्या आहेत त्यापैकी दारिद्रय ही ज्वलंत समस्या आहे ती दूर केल्यास निश्चित अर्थव्यवस्था विकसित होण्यास मदत होईल.